भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेंतर्गत” महिला स्वयंपाकींना देण्यात येणाऱ्या मानधनात वाढ करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: पेसाअ २०१६/प्र.क्र. २८८ /का-१७,**
**हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : १३ ऑक्टोबर, २०२५**

वाचा :

१) शासन निर्णय क्रमांकः आविवि-२०१५/प्र.क्र.७८/का-८, दि.१८ नोव्हेंबर, २०१५.
२) शासन निर्णय क्रमांक: आविवि-२०१६/प्र.क्र.८३/का-८, दि. ०५ ऑगस्ट, २०१६.
३) शासन परिपत्रक क्रमांक: पेसाअ-२०१६/प्र.क्र.२८८/का-१७, दि. १४ ऑक्टोबर, २०१६.
४) शासन निर्णय क्रमांक: आविवि-२०१८/प्र.क्र. ०४/का-८, दि. २२ जुन, २०१८.
५) भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेची राज्यस्तरीय संनियंत्रण समितीच्या दि. २३ एप्रिल, २०२५ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्त.
६) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांचे दि.०२ मार्च, २०२५ रोजीचे पत्र.

**प्रस्तावना:-**

अनुसूचित क्षेत्रातील कुपोषण, मातामृत्यू, बालमृत्यू व कमी वजनाची बालके जन्माला येणे यांसारख्या गंभीर समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यात एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत असलेल्या अंगणवाडयामार्फत अनुसूचित क्षेत्रातील गरोदर स्त्रिया व स्तनदा मातांना एक वेळचा चौरस आहार देण्यासाठी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना वाचा क्र.१ अन्वये दि. ०१ डिसेंबर, २०१५ पासुन सुरु करण्यात आली. वाचा क्र. २ नुसार, सदर योजनेच्या टप्पा २ अंतर्गत, अनूसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील अंगणवाड्यांतर्गत ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना प्रति दिन शाकाहारी मुलांना २ केळी व मांसाहारी मुलांना १ उकडलेले अंडे आठवडयातून ४ वेळा म्हणजेच महिन्यातून १६ दिवस एक वेळचा अतिरिक्त आहार देण्यात येत आहे.

वाचा क्रमांक ३ अन्वये, सदर योजनेअंतर्गत लाभार्थी गरोदर व स्तनदा मातेसाठी एक वेळचा पोषण आहार तयार करणे व ७ महिने ते ६ वर्षे वयोगटातील बालकांसाठी अंडी उकडणे इत्यादी अनुषंगिक कामासाठी दर दिवशी दोन तास कालावधी करता, प्रत्येक अंगणवाडी अंतर्गत एक महिला स्वयंपाकीची नेमणूक ग्रामसभेच्या सहमतीने आहार समितीकडून करण्यात येते व सदर महिला स्वयंपाकीसाठी अनुज्ञेय दरमहा रू. १००० इतका मानधनाचा खर्च अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना उपलब्ध करून दिलेल्या ५ टक्के अबंध निधी योजनेच्या निधिमधुन अदा करण्यात येतो.

सदर योजनेच्या संनियंत्रणासाठी स्थापन केलेल्या राज्यस्तरीय संनियंत्रण समितीच्या दि. २३.०४.२०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर योजनेंतर्गत पोषण आहार बनविणाऱ्या महिला स्वयंपाकींच्या मानधनात वाढीची मागणी लक्षात घेता ही योजना प्रभावीपणे कार्यरत राहून कुपोषणाचे निर्मूलन करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महिला स्वयंपाकींच्या मानधनात वाढ करणे उचित असल्याचे मत

राज्यस्तरीय समितीने व्यक्त करुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करावा असा निर्णय झाला. उपरोक्त निर्णयास अनुसरुन महिला स्वयंपाकींच्या मानधनात वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेच्या दि. १८ नोव्हेंबर, २०१५ व दि.१४ ऑक्टोबर २०१६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने, तसेच सदर योजनेच्या राज्यस्तरीय सनियंत्रण समितीच्या दि.२३.०४.२०२५ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयास अनुसरुन, सदर योजनेंतर्गत पोषण आहार बनविणाऱ्या महिला स्वयंपाकींच्या मानधनात रु. १००० वरुन रु २००० एवढी वाढ करण्यास शासन मान्यता देत आहे. सदर मानधन वाढ दि.०१ नोव्हेंबर २०२५ पासून अनुज्ञेय असेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५१०१३१३११३१४०२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVINKUMAR MANIK PANSARE

Digitally signed by PRAVINKUMAR MANIK PANSARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=b4a07dba225e6341bb7845b83f17f9bdd703019881501785e906a794a5b1e473, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=16D9E9BE1DA7EEA207781423C0B0F06E22786A5AE7DF2EBEF737066C141CC82B, cn=PRAVINKUMAR MANIK PANSARE
Date: 2025.10.13 13:12:57 +05'30'

**(प्रविणकुमार पानसरे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१) मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. मंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मंत्री (महिला व बाल विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मंत्री (अन्न व नागरी पुरवठा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) मा. राज्यमंत्री (आदिवासी विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) सर्व मा. संसद सदस्य
१०) सर्व मा. विधानसभा/विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ,
११) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१२) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१५ प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) प्रधान सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१७) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१८) सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

१९) सचिव, अन्न व नागरी पुरवठा विभाग, मंत्रालय, मुंबई,
२०) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२१) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.
२२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास महामंडळ, नाशिक
२३) महासंचालक, राजमाता जिजाऊ पोषण मिशन, नवी मुबंई
२४) आयुका, कुटुंब कल्याण, मंत्रालय, मुंबई-
२५) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, सी.बी. डी. बेलापूर, नवी मुंबई.
२६) संचालक, सार्वजनिक आरोग्य संचालनालय, मुंबई
२७) सर्व विभागीय आयुक्त.
२८) सर्व जिल्हाधिकारी (संबंधित)
२९) युनिसेफ़ राज्यप्रमुख, मुंबई
३०) स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी
३१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (अनुसूचित क्षेत्र/सर्व आदिवासी जिल्हे).
३२) सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास
३३) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
३४) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास प्रकल्प (१६ जिल्हे)
२५) सह संचालक, माहिती व प्रसिध्दी संचालनालय, मुंबई.
३६) सह संचालक, आरोग्य संचालनालय, मुंबई.
३७) सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,
३८) सर्व संबंधित उपमुख्य कार्यकारी अधिकारी, बाल कल्याण, जिल्हा परिषद,
३९) जिल्हा कोषागार अधिकारी (संबंधित जिल्हा),
४०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई नागपूर,
४१) महालेखापाल (लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर
४२) वित्त विभाग (व्यय-१४), मंत्रालय, मुंबई-३२
४३) सर्व सहसचिव/उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४४) निवड नस्ती, कार्यासन (०८)